# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

दिनांक २७.१०.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २६/१०/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ६१ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ४५,३५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंमर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. २७/१०/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयात एकुण ०१ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन ४.२३ लिटर दारू असा एकुण २,४००/—रू.कि.चा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

अपघात :— दिनांक 26/10/2022 रोजी फिर्यादी अमोल पि.राजकुमार पाईकराव वय 19 व्य.शिक्षण रा सावरखेडा ता जि हिंगोली यांचे फिर्यादी वरुन पोस्टे बासंबा येथे कलम 304अ,279,337,338, भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन 19.10.22 रोजीचे 18:00 वा चे सुमारास हिंगोली नांदेड रोडवर मौजे सावरखेडा ता जि हिंगोली आरोपीने त्याचे ताब्यातील मोसा क्र एमएच 38 ए सी 3969 हे हयगय व निष्काळजीपणे चालवुन रस्त्याच्या बाजुला मोटरसायकल जवळ उभे असलेले फिर्यादीचे वडील राजकुमार पाईकराव यांना मोटारसायकलसह जोराची धडक मारुन गंभीर जखमी करुन त्यांचे मुत्युस कारणीभुत ठरला म्हणुन गुन्हा. दाखल होवुन या संदर्भात बासंबा पोलीस तपास करित आहेत.